**MHBI090015492024**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.१), माजलगांव यांचे न्यायालयात**
**( पिठासीन अधिकारी—आर.बी.पोळ )**

**सक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०३९/२०२४**
**निशाणी क्र. १२ लगत**

**—: न्यायनिर्णय :—**
**(पारीत दिनांक २३/०४/२०२६)**

आरोपीवर मुंबई प्रोहिबीशन ॲक्ट कलम ६५(ई), प्रमाणे खटला दाखल करण्यात आलेला आहे.

२. प्रकरणाच्या निश्चितीकरिता माझे विचारार्थ पुढील मुद्दे आले असुन त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत:—

| *अनु. क्रमांक* | *मुद्दे* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| १. | दि. १९.०२.२०२० रोजी १६.०० वा.च्या सुमारास मौजे तेलगांव येथे आरोपी विनापरवाना बेकायदेशीररित्या गावठी हातभटटीची दारू जवळ बाळगून तिची चोरटी विक्री करीत असतांना मिळून आली व त्याद्वारे कलम ६५(ई) बॉम्बे प्रोहिबिशन ॲक्टप्रमाणे गुन्हा केल्याचे सरकारपक्षाने सिध्द केले काय? | नाही. |
| २. | अंतिम आदेश काय? | आरोपीची निर्दोष मुक्तता केली |

**कारणमिमांसा**

३. अभियोग पक्षाच्या वतीने प्रस्तुत प्रकरणात केवळ एक पंच साक्षीदार तपासण्यात आला. त्यानंतर अभियोग पक्षाकडून फिर्यादी, तपास अधिकारी व इतर

साक्षीदारास समन्स काढण्यात आले, परंतु फिर्यादी, तपास अधिकारी व इतर पोलीस साक्षीदारांना समन्स काढून देखील अभियोग पक्षाने साक्षीदार हजर केले नाहीत. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे पुरावा बंद करण्यात आला. तसेच साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास पुरक पुरावा न दिल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ नुसार निवेदन नोंदविण्यात आले नाही व तसा आदेश नि.क्र. १ वर पारीत करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u> :–**

४. अभियोग पक्षाच्या कथनानुसार दि. १९.०२.२०२० रोजी १६.०० वा.च्या सुमारास मौजे तेलगांव येथे आरोपी अर्चना गायकवाड विनापरवाना बेकायदेशीररित्या गावठी हातभटटीची दारू जवळ बाळगून तिची चोरटी विक्री करीत असतांना मिळून आली. सदरील बाब सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षावर होती.

५. सदरचा खटला सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने सा.क्र.१ सुदाम अभिमान गुजर या पंच साक्षीदारास संपरिक्षेत तपासण्यात आले. सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीमध्ये तो आरोपीस ओळखत नसून त्याला दिंद्रुड पोलीसांनी जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलाविले नसल्याचे कथन केले. पोलिसांनी त्यांचेसमक्ष कोणताही पंचनामा केलेला नाही. पंचनाम्यावर त्यांची सही असुन पंचनाम्यामध्ये काय लिहीले ते माहित नसल्याचे कथन केले. प्रस्तुत प्रकरणात वेळोवेळी समन्स काढुन देखील अभियोगपक्षाने फिर्यादी, तपास अधिकारी व इतर पोलीस साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे दोष सिध्दीकरीता केवळ पंच साक्षीदाराच्या साक्षीवर विसंबून राहता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये तपासीक अंमलदार यांनी आरोपीकडून जप्त केलेले द्रव्य हे कोणत्या स्वरुपाचे होते याचा उलघडा केलेला नाही. तसेच सदर प्रकरणात अभियोगपक्षाने रासायनिक प्रयोगशाळा पृथक्करण अहवाल दाखल केला नाही. त्यामुळे आरोपी विरुध्द नि:संशयरित्या आरोप सिध्द होणारा नाही. सबब, आरोपीस संशयाचा फायदा देवून दोषमुक्त करणे क्रमप्राप्त ठरते. तसेच, फिर्यादमध्ये नमूद केल्याप्रमाणे उर्वरित घटनास्थळावरील मिळून आलेली गावठी हातभट्टीची दारू पंचांसमक्ष नाश केलेली असल्याने त्याबाबत वेगळा आदेश नाही. सबब, मुद्दा नं.१ चे उत्तर नकारार्थी देणेत येवुन मुद्दा क्र.२ चे उत्तराकरिता खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे :–

**आदेश**

१) आरोपी नामे **अर्चना अंकुश गायकवाड** हिची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) नुसार मुंबई प्रोहिबीशन कायदा कलम ६५(ई) अन्वये लावलेल्या दोषातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) प्रमाणे वैयक्तिक बंधपत्र रक्कम रूपये १५०००/—चे दयावे.

RAHUL BALBHIM POL

Digitally signed by RAHUL BALBHIM POL
Date: 2026.04.23 15:00:31 +0530

दिनांक : २३/०४/२०२६ (आर.बी.पोळ)
ठिकाण : माजलगाव. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माजलगाव.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Dictated, transcribed, Checked & signed on : 23/04/2026

Sd/-

Date: 23/04/2026

R.M.Shaikh
Gr-III Stenographer
Judicial Magistrate F.C., Majalgaon.